# मराठी साहित्याचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष



प्रधान संपादक

डॉ. एस. डी. पवार | प्रा. धन्यकुमार बिराजदार

सहायक संपादक

प्रा. गंगाधर गेह | डॉ. परमेश्वर पाटील

Scanned by CamScanner

# मराठी साहित्याचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष



**सौम्य प्रकाशन, विजयपूर.**
'कबीर कुंज', महाबळेश्वर कॉलनी,
दर्गा जेल समोर, विजयपूर – ५८६१०३ (कर्नाटक)
दूरभाष : ९४४८१८५७०५

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| लेखाचे नाव | पान नं. |
|---|---|
| १. बसवेश्वरः स्त्री मुक्ति चळवळ – डॉ. एस.जे. पवार | १ |
| २. महात्मा बसवेश्वर : सामाजिक समतेचे प्रणेते – प्रा.धन्यकुमार जिनपाल बिराजदार | ९ |
| २. सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्त्रोत : संत तुकाराम – डॉ. एस. जे. जहागिरदार | १४ |
| ३. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथासाहित्यातील स्त्री जीवन – प्रा. गंगाधर म. गेंड | २० |
| ४. मराठीला जागतिक स्थान देणारे : राजर्षी शाहू महाराज – डॉ. श्रीपती म.रायमाने | २९ |
| ५. बहिणाबाईचे मराठी साहित्याला योगदान – प्रो : नर्मदा र कुराडे. | ३४ |
| ६. कुसुमाग्रजांचे वैश्विक साहित्याला योगदान – प्रा. चारूदत्त भा. कासार | ४० |
| ७. भारतीय साहित्यातील संक्षिप्त शेतकरी जीवन – डॉ.बापुराव व्ही. पाटील | ४७ |
| ८. समाजजीवन–लोकजीवनाचे प्रतिबिंब : लोकसाहित्य – परमेश्वर म. पाटील | ५५ |
| ९. मराठी भाषा– बाल साहित्य – प्रा. विदया एस. हिरेमठ | ६३ |
| १०. मराठी दलित कविता : आंबेडकरी विचारधारा – डॉ.पी.एम. पाटील | ६९ |
| ११. जागतिकीकरण आणि मराठी – प्रा.डॉ. अमित शिवाजीराव | ७८ |
| १२. मराठी भाषेची स्थिती गती – प्रा. अलका आ. मुतगेकर | ८१ |
| १३. बहिणाबाई मराठी साहित्याची आई – नताशा अनिल गायकवाड | ९२ |
| १४. "दलित साहित्य व अण्णाभाऊ साठे" – आरती रा. चव्हाण | ९५ |
| १५. "लोकसंपर्क माध्यम आणि हिंदी" – प्रा. नीता पाटील | ९८ |


Scanned by CamScanner

# बसवेश्वरः स्त्री मुक्ति चळवळ

डॉ. एस. जे. पवार
विजयपूर, कर्नाटक

संपूर्ण जगामध्ये संस्कृतीची प्रतिष्ठापना व उध्दार करणाऱ्या महान व्यक्तिमध्ये जगत्ज्योति बसवेश्वरांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. सामाजिक समता, विश्वबंधुत्व, लोकशाही, सामाजिक न्याय, सामाजिक गौरव, समाजसेवा, दलितोध्दार, स्त्रियोध्दार, मानवता सद्भावना, अहिंसा, दया, करुणा, सहानुभूती, त्याग, शांती यासारखे महत्त्वपूर्ण तत्त्व व सिध्दांत बसवेश्वरांच्या सामाजिक विचारात अंतर्भूत झाली आहे.

समाज आणि स्त्री यांचे अन्योन्य संबंध असतात. स्त्री हा कोणत्याही समाज व्यवस्थेचा एक प्रमुख व महत्त्वाचा घटक असतो. स्त्री ही एक समाजाची एक अस्मिता असते. जगातील निम्मी लोकसंख्या स्त्रियांनी व्यापलेली आहे. यासाठीच स्त्रियांना 'अर्धे विश्व' म्हटले जाते. एकूण स्त्रियांची स्थिती, समस्या, हक्क आणि चळवळ यांचा विचार केला तर संमिश्र स्वरुपाचे चित्र उभे राहते. स्त्री मुक्ति, स्त्रियांचे स्वातंत्र्य, स्त्रियांचे अधिकार, स्त्रियांचे मानवाधिकार, स्त्रियांचे हक्क आणि चळवळ, स्त्रियांच्या संघटना, स्त्रियांचे सबलीकरण, स्त्रियांचे सक्षमीकरण, स्त्रियोध्दार, स्त्री मुक्ती आंदोलन, स्त्री मुक्ती चळवळ यांसारखे शब्दप्रयोग अलिकडे सर्वत्र केले जात आहेत.



Scanned by CamScanner

आधुनिक काळात राजाराम मोहन रॉय, केशवचंद्र सेन, स्वामी दयानंद सरस्वती, न्यामूर्ती गुरुदेव रानडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अनेक मान्यवरांच्या विशेष प्रयत्नामुळे स्त्री-विषयीच्या मानवाधिकारांना आणि चळवळींना एक राष्ट्रीय परिमाण, एक राष्ट्रीय व्याप्ती लाभलेली आहे. स्त्री-विषयीच्या मानवाधिकारांना आणि चळवळींना भारतीय समाज व्यवस्थेत मध्ययुगापासून म्हणजे १२ व्या शतकातील बसवेश्वरांपासून विशिष्ट पार्श्वभूमी लाभलेली आहे.

* स्त्री मुक्ति सामाजिक दर्जा .

स्त्री-मुक्ति संकल्पनेचा संबंध हा प्रायः स्त्रियांच्या सामाजिक दर्जाशी असते . स्त्री मुक्तीची संकल्पना तसेच भारतीय स्त्रियांचा सामाजिक दर्जा अभ्यासताना काही कालखंड विचारात घ्यावे लागतात. वेदकालीन, प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड, ब्रिटीश कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड या चारही कालखंडामध्ये स्त्रियांच्या सामाजिक दर्जाव्यवस्थेत तसेच अधिकारांत अनेक परिवर्तने व स्थित्यंतरे झालेली आहेत.

काही विचारवंतांनी असे म्हटले आहे की वेदकालात म्हणजे साधारणतः ३५०० ते ५००० वर्षाच्या दरम्यान स्त्री व पुरुष यांचा सामाजिक दर्जा समान होता. धर्म कृत्यांतील स्त्रीचा सहभाग 'सहधर्मचारिर्णी' म्हणून स्त्रीचा केलेला गौरव, स्त्रीधनाची संकल्पना



Scanned by CamScanner

इत्यादी बाबतीत वेदकालात स्त्रीच्या सामाजिक दर्जास काहीसे जपलेले होते. या पार्श्वभूमीवर डॉ. ए. एस. आळतेकर म्हणतात– ''वेदकाली म्हणजे आर्य भारतात आलेल्या सुमारास आर्य समाज बराच सुसंस्कृत होता आणि स्त्रीचे समाजातील स्थान पुरुषाशी भागीदारीचे असे होते.'' तथापि चांगल्या म्हणजे समान सामाजिक दर्जाबाबतचा निर्णय हा केवळ तर निर्देशित गोष्टींवर अथवा घटकांवर घेता येणार नाही. त्यासाठी समान सामाजिक दर्जाचे निकष लक्षात घ्यावे लागतील.

**※ समान दर्जाचे काही प्रमुख निकष :**

स्त्री-पुरुषातील समानता ही कुटुंबामध्ये सर्वकष अधिकार कोणाचा चालतो ? सामाजिक जीवनातील विविध घटनांमध्ये अंतिम निर्णय घेण्याची सत्ता कोणाकडे असते? बहुविवाहाची शक्यता म्हणजे एकाहून अधिक व्यक्तींशी विवाह स्त्री की पुरुष, कोण करु शकतो. कुटुंबांची वंशपरंपरा कोणाच्या नावाने चालते? दत्तक प्रसंगामध्ये मुलाला की मुलीला दत्तक घेतले जाते? इत्यादी काही मूलभूत निकषांच्या आधारेच त्याबाबत निर्णायक विधाने करावी लागतात.

या दृष्टिकोनातून विचार करता अस दिसून येते की वेदकालीन समाजात कुटुंबामध्ये सर्वकष अधिकार हा पुरुषाचा असे. सामाजिक जीवनातील विविध घटनांचे अंतिम निर्णय घेण्याची सत्ता ही पुरुषाकडे होती. बहुविवाहाची शक्यता केवळ पुरुषाबाबत म्हणजे



Scanned by CamScanner

एक पुरुष अनेक स्त्रियांशी विवाह करु शकत असे. कुटुंबाची वंशावळ पुरुषाच्या नावाने चालत होती. दत्तकप्रसंगी मुलगा दत्तक घेतला जात असे. अर्थात याबाबत आजही अशीच प्रथा रुढ आहे. विवाह विषयकांच्या प्रश्नांवर भाष्य करताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात ''वेदकालात स्त्री-पुरुषांचा दर्जा समान होता हे विधान मान्य होण्यासारखे नाही. वेदकाळी एकाच पुरुषाने पुष्कळ बायकांशी लग्न करण्याचा प्रघात होता व त्याचे समर्थनही पुष्कळ ठिकाणी वेदांमध्ये केलेले आढळते. याबाबत शेकडो आधार आहेत. स्त्रियांना मात्र एकच पती असला पाहिजे असे स्पष्ट विधान त्याच संदर्भात वेदांमध्ये केलेले दिसते. त्याचप्रमाणे स्त्रीला वारसाहक्क नाही, असेही वेदांतात स्पष्ट म्हटले आहे.''

साधारणतः मध्ययुगापासून म्हणजे १२व्या शतकातील महात्मा बसवेश्वरयुगापर्यंत स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसरत चालला होता. मध्ययुगातच 'स्त्री-पुरुष समानता', 'स्त्रियांचा चांगला सामाजिक दर्जा' संकल्पना खऱ्या अर्थाने ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली. त्यानंतर ब्रिटीश आमदानीत स्त्री-विषयक पुनरुत्थान झाले आणि भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेषतः शिक्षण प्रसार विषयक विविध कायद्यात्मक तरतुदीमुळे स्त्रियांच्या सर्व क्षेत्रांतील कर्तबगारीला संपूर्ण अनुकूल वातावरण निर्माण झाले.

* बसवेश्वर आणि स्त्री-मुक्तिची संकल्पना : काही अभिप्राय

स्त्री-मुक्ति आणि चळवळ यांना १२ व्या शतकात विशिष्ट



Scanned by CamScanner

पार्श्वभूमी लाभलेली आहे. याबाबत काही मान्यवरांचे अभिप्राय पुढील प्रमाणे असे -

**डॉ. सरोजिनी शिंत्री यांच्या मते** - "अनेक समाज सुधारकांनी स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक हक्कांबद्दल प्रयत्न केले. परंतु धार्मिक क्षेत्रात सुध्दा त्यांना हक्क मिळावा म्हणून कोणी विशेष प्रयत्न केले नाहीत.' केवळ बसवेश्वरांनीच हे जाहीर केले की स्त्रियांसुध्दा धार्मिक क्षेत्रात पुरुषांइतक्याच हक्कदार आहेत. आजही स्त्रियांवर जेथे अनन्वित अत्याचार होतात, तेथे त्या काळी बसवेश्वरांनी स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी केवढा प्रखर लढा दिला असेल याची कल्पना येते. सर्व क्षेत्रांत स्त्रिया यशस्वी होऊ शकतात, हे सिध्द झाले. काही क्षेत्रात त्या पुरुषांपेक्षा कणभर सरस ठरतात हेही सिध्द झाले आहे. बसवेश्वरांनी हे जाणले होते म्हणूनच स्त्री-मुक्तिची चळवळ त्यांनं सुरु केली आणि त्या ते यशस्वीही झाले." १

**डॉ. जयदेवीताई लिगाडे यांच्या मतानुसार** - "वेदांतमध्ये ऋषी म्हणतात 'मातृ देवो भव' ज्याचा अर्थ माता ही देवता होय. मुलाला जन्म देणाऱ्या आणि त्याचे संवर्धन करणाऱ्या मातेतच नव्हे तर सर्व स्त्रियांत शरणांनी 'देवता' पाहिलेली आहे. वीरशैव शरणांनी स्त्री जातीला देवता मानलेली आहे." २

**दि टाइम्स ऑफ इंडिया** दैनिक पत्रिकानुसार "बसवेश्वरांच्या चळवळीचे हे वैशिष्ट आहे की त्यांच्यापूर्वी जरी अनेकांनी सामाजिक

Scanned by CamScanner

व धार्मिक सुधारणांसाठी प्रयत्न केलेले असले तरी बसवेश्वरांनी त्याकाळी अतिसाहस दाखवून स्त्री-मुक्ति तसेच सुधारणा यांसाठी प्रचंड कार्य केले. बालविवाह, विधवांची गुलामगिरी, स्त्रियांची उन्नती इत्यादींबाबत त्यांनी विधायक व तेजस्वी प्रयत्न केले. आजसुध्दा प्रत्येक वर्षी या विषयावर परिषद होतात. अनेक प्रकारचे प्रयत्न होतात. तरी बसवेश्वरांच्या कार्याच्या तुलनेने त्या नगण्य आहेत.''

**माते महादेवी** यांच्या मतानुसार ''इतर अनेक समुदायांत दृढ स्वरुपात प्रचलित असलेल्या कल्पनेच्या बरोबर विरुध्द लिंगायत समुदायात स्त्रीला अशुभलक्षणी मानले जात नाही. तिच्या पतीच्या मृत्युनंतर मंगळसूत्राव्यतिरिक्त तिने कोणत्याही दागिन्याचा त्याग करण्याची किंवा केशव्यपन करण्याचीही गरज नसते. या दोन्ही प्रथांचे महान सुधारक बसवांनी फार पूर्वीच समाजातून निर्मूलन केलेल आहे.''

*** बसवेश्वरांनी राबविलेले स्त्रीविषयक विविध उपक्रम :**

महात्मा बसवेश्वरांनी १२व्या शतकात विशेषतः ११५६ ते ११६७ च्या दरम्यान बहुद्देशिय महिला संघटना स्थापिल्या होत्या. स्त्री-साक्षरता, स्त्रियांसाठी व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, युध्द कलेतील स्त्रियांचे प्रशिक्षण, युध्द प्रसंगातील स्त्रियांचा सशस्त्र सहभाग, प्रौढ विवाह, विधवा विवाह, आंतर जातीय विवाह, स्त्रियांचे धार्मिक व आध्यात्मिक स्वातंत्र्य, स्त्रियांची वाङ्मयीन

Scanned by CamScanner

निर्मिती, 'अनुभव मंटप' या लोक पीठातील स्त्रियांचे सदस्यत्व, सामाजिक संस्थांचे स्त्रियांचे सदस्यत्व, धार्मिक व सामाजिक विषयांवरील चर्चा सत्रातील स्त्रियांचा नियमित सहभाग, अपंग व भिक्षेकरी स्त्रियांचे पुनर्वसन, निराधार स्त्रियांचे पुनर्वसन, वृध्द स्त्रियांचे पुनर्वसन, विधवांचे पुनर्वसन, वेश्यांचे पुनर्वसन इत्यादी गोष्टींबाबत विविधांगी उपक्रम बसवेश्वरांनी राबविलेले आहेत. विशेष उल्लेखनीय म्हणजे आज देखील काहिशा नव्या वाटणाऱ्या अनेक उपक्रमांची प्रत्यक्ष कार्यवाही महात्मा बसवेश्वरांनी केलेली आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा बसवेश्वर हे स्त्री-मुक्ति संकल्पना आणि चळवळ यांचे प्रेरणास्त्रोत ठरतात.

विशेष म्हणजे स्त्री-मुक्ति संबंधिच्या महात्मा बसवेश्वरांच्या संकल्पनांना आणि प्रयत्नांना त्यांच्या नंतरच्या कालखंडात देखील खूप चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील विजापूर जिल्ह्यातील बेळवड्डी संस्थानच्या राणी मल्लाम्मा देवी, केळदीच्या महाराणी चन्नम्मा तसेच भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील पहिल्या विरांगना राणी कित्तुर चन्नम्मा या स्त्री सबलीकरण आणि स्त्रियोध्दाराची अलिकडे काही प्रतिनिधिक उदाहरणे होत. सर्वप्रकारच्या स्त्री जीवनाकडे बसवेश्वरांनी लक्ष्य पुरविले होते. हे त्यांच्या स्त्री-विषयक विचारांचे वैशिष्ट्य होय. महात्मा बसवेश्वर हे स्त्री-मुक्ति संकल्पनेचे आणि चळवळीचे प्रवर्तक जनक ठरतात. तेव्हा स्त्री-मुक्ति विषयाची

Scanned by CamScanner

महात्मा बसवेश्वरांची संकल्पना भूमिका आणि कार्य याबाबत विद्यापीठ स्तरावर आणखी स्वतंत्र असे संशोधन होणे अगत्याचे आहे.

**डॉ. एस. जे. पवार**
एस.बी. कला आणि के.सी.पी.
विज्ञान महाविद्यालय, विजयपूर
मो. ९४४९७४१८१३

Scanned by CamScanner